करोना २०२०/सूचनां/आदेश क्र. १४५

महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग
दुरध्वनी क्रमांक :- ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२००१ फॅक्स क्रमांक: ०२१४१-२२२०२५/२२७४५१
Email :collector_raigad@maharshtra.gov.in Email dcraigad@gmail.com

---

क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोनाविषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२० दि. २२ /०३/२०२०

वाचले:- १) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम-२००५
२) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचनां क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/ आरोग्य ५ दि.१३/०३/२०२०
३) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील साथरोग अधिनियम, १८९७ ची नियमावली दि.१४/०३/२०२०
४) साथ रोग अधिनियम १८९७

**आदेश**

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

शासनाने करोना विषाणूचा (COVID-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३/०३/२०२० लागू करण्यात आलेला आहे. त्याबाबतची उपोद्घातातील अ.क्र.२ कडील अधिसूचनां लागू करण्यात आलेली आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने करोना विषाणू संक्रमण हा जागतिक साथीचा रोग (World Pandemic) घोषित केला आहे. त्यानुषंगाने करोना विषाणू बाधित देशातून भारतात येणाऱ्या प्रवाशांना Quarantine Cell मध्ये त्यांचा Incubation Period संपेपर्यंत निगराणीखाली ठेवण्यात यावे, अशा सूचनां दिलेल्या आहेत. त्यामुळे जिल्हयात परदेशातून येणाऱ्या प्रवाशांसाठी हॉस्पीटल पासून दूर अंतरावर स्वतंत्र कक्षाची (Quarantine Cell) संख्या वाढविण्याची आवश्यक आहे. तसेच कोरोना विषाणूची लक्षणे असलेल्या रुग्णांसाठी विलगीकरण कक्षाचीही (Isolation Bed) संख्याही वाढविणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, श्रीमती निधी चौधरी, जिल्हाधिकारी, रायगड तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, रायगड, मला उपोद्घातातील अ.क्र.३ कडील नियम १० मध्ये नमूद केल्याप्रमाणे करोना विषाणूचा (COVID-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून शासकीय किंवा खाजगी इमारत/मत्ता विलगीकरणासाठी आवश्यकतेनूसार नामनिर्देशित करण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. त्याचा वापर करुन परदेशातून आलेल्या नागरिकांसाठी तसेच त्यांच्या संपर्कात आलेल्या नागरिकांसाठी स्वतंत्र कक्ष (Quarantine Cell) स्थापित करुन त्यांना आवश्यक त्या आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता पुढील आदेश होईपर्यंत अलिबाग तालुक्यातील कोकण एज्युकेशन सोसायटी यांच्या अखत्यारीतील **सी.एच.केळुस्कर होमीओपॅथीक मेडीकल कॉलेज अलिबाग** इमारतीसह इमारतीमधील उपलब्ध सर्व संसाधने, डॉक्टर्स तसेच स्टाफ नर्स, शेवटच्या वर्षात वैद्यकीय शिक्षण घेत असलेले विद्यार्थी, सफाई कर्मचारी यांचेसह अधिग्रहित करण्याचे आदेश देत आहे.

तहसिलदार अलिबाग यांनी सदर इमारती व इमारतीमधील उपलब्ध सर्व संसाधने तात्काळ अधिग्रहित करुन ताब्यात घ्यावीत. सदरचे मदत कार्य पुर्ण झाल्यानंतर अधिग्रहित केलेली सर्व खोल्या व इतर संसाधने निर्जंतूकीकरण (fumigation) करुन संबंधितास सुस्थितीत परत करावीत.

सदर आदेशास तात्काळ अंमल देण्यात यावा.

( निधी चौधरी )
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग

प्रति,
१) अध्यक्ष, को.ए.सो. सी.एच.केळुस्कर होमीओपॅथीक मेडीकल कॉलेज अलिबाग
२) तहसिलदार अलिबाग

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
१. मा.सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई
३. जिल्हा शल्य चिकित्सक रायगड
४. जिल्हा आरोग्य अधिकारी रायगड
५. उपविभागीय अधिकारी अलिबाग

(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग